गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५


## 'होम बेस्ट हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स'साठी संधी

**गडचिरोली :** भारत सरकार व इस्रायल सरकार यांच्यात विशिष्ट कामगार क्षेत्रांमध्ये तात्पुरत्या रोजगारासाठी फ्रेमवर्क करार झाला असून त्याअंतर्गत २ अंमलबजावणी प्रोटोकॉल्सवर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. यापैकी प्रोटोकॉल- बी हा काळजीवाहक क्षेत्राशी संबंधित आहे. इस्रायल सरकारने भारताकडून ५ हजार घरगुती काळजीवाहकांची मागणी व्यक्त केली आहे. या मागणीची तातडीने पूर्तता करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (एमएसडीई) कार्यरत आहे.

राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या कार्यक्षेत्रातून योग्य उमे. दवारांची जागृती व प्राथमिक छाननी करून मंत्रालयाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इस्त्राईल देशात 'होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कर्स' या पदासाठी ५ हजार नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. या पदाचे कार्य विवरण, वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, पदभरती अर्ज इ. माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवार लिंकवर अर्ज सादर करावा.

# विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञानसंपन्न व्हावे

### प्राचार्य डॉ. एम.जे. मेश्राम : शिवाजी महाविद्यालयात नवागथांचे स्वागत व उद्बोधन कार्यशाळा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ११ :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग नोंदवून आपला बौद्धिक व शारीरिक विकास साधावा व आपला अमूल्य वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञानसंपन्न व्हावे, असे आव्हान महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. एम.जे. मेश्राम यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आणि उपलब्ध सोयी-सुविधा याबद्दल माहिती सां. गितली.

स्थानिक शिवाजी महाविद्यालयत १० सप्टेंबर रोजी नवागथांचे स्वागत व उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रा. संजय राऊत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागातील विविध विभागांची माहिती दिली व ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात




येणाऱ्या सेवांची ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून स्वतःचा बौद्धिक विकास कसा साधता येईल यावर मार्गदर्शन केले. डॉ. आर. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात खेळण्यात येणाऱ्या खेळांची माहिती दिली व क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून आपला शारी. रिक विकास कसा साधावा व खेळाच्या माध्यमातून आपलं भविष्य कसे उज्वल करता येईल यावर मार्गदर्शन केले. डॉ. आर. पी. करोडकर यांनी विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागा आणि राज्यशास्त्र विषयाबद्दल माहिती दिली, प्रा. रुपेश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषय व प्रोजेक्ट याबद्दल माहिती दिली. डॉ. कैलास भांडारकर यांनी विद्यार्थ्यांना महिला तक्रार तक्रार निवारण व विद्यार्थी तक्रार निवारण, तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाबद्दल मार्गदर्शन केले व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच आपण महाविद्यालयात कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी व विद्यार्थिनींना शारीरिक क्षण होणार नाही यावर मार्गदर्शन केले. डॉ. जे. जी. उईके यांनी विध्यार्थ्यांना 'एनईपी' अभ्यासक्रमाबद्दल तसेच इंग्रजी विषयाबाबत माहिती सांगितली. प्रा. आर. के. नंदागवळी यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा विषयी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात शिष्यवृत्तीबद्दल मिलिंद म्हशाखेत्री यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती स्वाधार योजना व फ्री शिप यावर मार्गदर्शन केले तसेच अजय मशाखेत्री यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा विभागा विषयी माहिती दिली. परीक्षा फॉर्म सुरु झाल्यानंतर त्याची मुदत व परीक्षा फॉर्म भरण्याची पद्धत यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय राऊत यांनी केले यांनी केले तर आभार प्रा. आर. एस. कोल्हे यांनी मानले.




अहेरी तालुक्यातील चेरपल्ली मुख्य रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. रस्त्यावरील खड्डे पाण्याने भरले आहेत. या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत आहेत. त्यामुळे येथुन ये-जा करताना वाहनचालकांना आणि शालेय विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. (दीपक सुनतकर अहेरी)

## ४५० रूग्णांची तपासणी; १२५ रूग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र

### अतुल गण्यारपवार यांच्या वाढदिवसानिमित्त शिरिचे आयोजन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ११ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल गण्यारपवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गडचिरोली येथील गो. कुलनगरातील आशिर्वाद सभागृहात मंगळवार ९ सप्टेंबर रोजी मोति. बिंदु शस्त्रक्रिया व नेत्रतपाणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४५० रूग्णांची नेत्रतपासणी करून औषध देण्यात आले. तसेच २०० रूग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच नेत्रतपासणी दरम्यान १२५ रूग्णांमध्ये मोतिबिंदु आढळल्याने १८ सप्टेंबरला त्यांच्यावर नागपुर येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

शिबिराचे आयोजन गण्यारपवार फाऊंडेशन चामोर्शी व महात्मे आय हॉस्पीटल नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. सर्वप्रथम शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राकॉं (शप)चे चिटणीस ॲड.



संजय ठाकरे, शहराध्यक्ष विजय गोरडवार, जिल्हा उपाध्यक्ष नईम शेख, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष शेमदेव चाफले, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष हुसेन शेख, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे संचालक अमोल गण्यारपवार, जिल्हा उपाध्यक्ष संजय श्रृंगारपवार, महिला जिल्हाध्यक्षा संगिता राऊत, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष वैभव शि. वनकर, माजी नगरसेविका संध्या उइके, मिनल चिमुरकर, भास्कर निमजे, निर्मल भोयर, सुनिल चिमुरकर, विवेक कांबळे, निता बोबाटे, करिष्मा चौधरी आदी उपस्थित होते.

तसेच वाढदिवसादिनी गडचिरोली येथील महिला रूग्णालयात अन्नदान, जिल्हा सामान्य रूग्णालयात फळ वाटप, लांझेडा येथील कौसल्या निवासी मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना फळ व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते. तसेच गो. कुलनगर येथील सुमारे ३०० महिलांना ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा युका अध्यक्ष हिमांशु देशमुख, आशा मेश्राम, मिना डहाके, सपना मरसकोल्हे, बेबीताई लभाने, माया आकेवार, मोनु पठाण, मलय्या कालवा, निलेश कोटगले, राजु डांगेवार, आदींचे सहकार्य लाभले.

## समिधा महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**गडचिरोली :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची जाणीव जागृती व्हावी, विद्यार्थ्यांना प्रशासनाबद्दल आवड निर्माण व्हावी, ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रशासनात जावा, या उद्देशाने समिधा कॉलेज ऑफ सिव्हिल सर्व्हिसेस गडचिरोली येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सेमिनार आयोजित करण्यात आले. या सेमिना. रमध्ये मुख्य मार्गदर्शक सुदर्शन जानकी उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, आपले ध्येय निश्चित करा. नियमित वाचन व अभ्यास करा. बीएच्या ३ वर्षातच तुम्ही अधिकारी होऊ शकता, हे नियोजन विद्यार्थ्यांना सांगितले. या सेमिनारला प्राचार्य मनोज ढोलणे, प्रा. विनोद कुनघाडकर, प्रा. अंकुश गोहणे, प्रा. प्रितम कोहपरे, प्रा. सुनील भुरसे उपस्थित होते.

## महाबोधी महाविर बौध्दांच्या स्वाधिन करा

### बुद्धिष्ट इंटरनेशनल नेटवर्कची मागणी

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ११ :** बुध्दिष्ट इंटरनेशनल नेटवर्क, भारत मुक्ती मोर्चा व आरपिआयच्या वतीने बिहारमधील महाबोधी महाविहार बौद्धांच्या स्वाधिन करण्यात यावे, यासाठी जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. हे आंदोलन चरणबद्ध असून दुसऱ्या चरणात १७ सप्टेंबर रोजी धरणे आंदोलन व तिसऱ्या चरणात १ आक्टोबर ला रॅली प्रदर्शन भारतभर करण्यात येणार आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नागपूरची दिक्षाभूमी ही ॲकेडमीक शिक्षण केंद्र न करता धम्म शिक्षण केंद्र करण्यात यावे. तेथे एक हजार भिक्खूंचे प्रशिक्षण केंद्र बनवावे. देशा



निवेदन देताना बामसेफचे जिल्हाध्यक्ष भोजराज कान्हेकर, आरपिआयचे जिल्हाध्यक्ष

विदेशातून येणाऱ्या अनुयायांसाठी भव्य विश्वानगृह तयार करण्यात यावे. दिक्षाभूमिचे सौदर्यीकरण करण्यात यावे. ईव्हीएम मशीन हटवून बॅलेट पेपरवर निवडणूका घेण्यात यावे. ओबीसींची त्यांचबरोबर सर्व जातींची जातनिहाय जनगणना करण्यात यावे. प्रत्येक जातींना पर्याप्त आरक्षण देण्यात यावे. आदिवासींचे विस्थापन थांबवावे. हिंदू मुस्लिमांमध्ये भांडणे लावणे थांबवावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

मुनिश्वर बोरकर, राष्ट्रीय किसान मोर्चाचे जिल्हा प्रभारी प्रमोद राऊत, आरपिआयचे उपाध्यक्ष दशरथ साखरे, सहसचिव मारोती भैसारे, प्रेमदास रामटेके, दामोधर शेंडे, आदिवासी संघटनेचे उमेश उईके, डोमाजी गेडाम, नरेंद्र शेंडे, जीवन मेश्राम, विद्या दुग्गा, तनुजा कुमरे, आरती कोल्हे, आरती कंगाले, शामला घोडाम, वनिता ताराम तसेच बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोनसरी तंमुस अध्यक्षपदी गुरनुले

**चामोर्शी:** कोनसरी येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्ष पदासाठी ग्रामपंचायत कोनसरी येथील सभागृहात ग्रामसभेची बैठक घेण्यात आली. यात चंद्रशेखर गुरूनुले यांची निवड करण्यात आली. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय ग्रामपंचायत सदस्य राकेश दंडीकवार, दीपक मोहुर्ले, दशरथ पोतराजवार, नानाजी पाटील सरवर, गंगाधर दिवसे, रामदास तोरे, चिनाजी निकोडे, आर्दीनी दिले.

## विकास विद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ११ :** स्थानिक विकास विद्यालय तथा थोरवी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात सोमवारी (दि. ८) क्रीडा व युवक सेवा संच. ालानालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुरखेडाचे तहसीलदार राहुल पाटील होते. उद्घाटक संस्था अध्यक्ष पी. आर. आकरे तर प्रमुख अतिथी म्हणून पोलिस निरीक्षक महेंद्र वाघ, संस्था सचिव नंदा आकरे, गटशिक्षणाधिकारी प्रवींद्र शिवणकर, तालुका क्रीडा सचिव यु. एन. कोचे, प्राचार्य नागेश फाये, गौरकर, प्राचार्य उमा चंदेल, मुख्याध्यापक आर. एम. अलगदेवे, प्राचार्य कंठावार, खेत्रे, जे. आर. मस्के, मरस्कोल्हे, ठेला, बावने उपस्थित होते. संचालन महेंद्र सोनकुकरा यांनी केले. आभार रेमाजी बावणे यांनी मानले.

# व्यक्तिमत्व विकासासाठी क्रीडा स्पर्धा आवश्यक: आ. डॉ. नरोटे

### गडचिरोलीत जिल्हास्तरीय अजिंक्यपद कराटे स्पर्धा उत्साहात

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ११ :** शिक्षणाच्या माध्यमातून बौद्धिक विकासाला चालणा मिळते. केवळ बौद्धिक विकास साध्य होऊन चालत नाही. बौद्धिक विकासा. सोबत शारीरिक विकास होणे गरजेचे आहे. खेळाच्या माध्यमातून सांघिक व एकाग्रता वाढण्यास मोठी मदत होत असते. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणासह खेळाकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. खेळातून व्यक्तीमत्व विकासाला चालणा मिळत असते, असे प्रतिपादन आमदार डॉ. मिलींद नरोटे यांनी केले.

गडचिरोली जिल्हा अम्युचर क्रीडा कराटे डो असोसिएशनच्या वतीने प्रसन्न हॉल येथे १६ वी जिल्हास्तरीय अजिक्यपद स्पर्धा उत्साहत पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गडचिरोली जिल्हा अम्युंचर क्रीडा कराटे डो असोसिएशनचे अध्यक्ष



प्रशांत वाघरे तर प्रमुख अतिथी म्हणून असोसिएशनचे उपाध्यक्ष रुपराज वाकोडे, राज्य क्रीडा मार्गदर्शक बडकेलवार, मिलिंद उमरे, अविनाश वरगंटीवार, राज्य गुप्तवार्ता विभागाचे सहाय्यक आयुक्त संदीप भांड आदी उपस्थित होते.

ही स्पर्धा ६ ते २१ वर्षावरील मुले, मुली विविध वजन गटात घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये गडचिरोली, वडसा, चामोर्शी, धानोरा, आरमोरी, अहेरी, एटापल्ली तालुक्यतील खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यात सब जुनि. अर मुलींमध्ये प्रथम क्रमांक दीपेश्री इंगुलकर, द्वितीय सुरभी इंगुलकर, तृतीय आर्या चहांदे, सब जुनिअर चॅम्पियन ऑफ चॅम्पियन मुलांमध्ये प्रथम क्रमांक सार्थक नेरकर, द्वितीय प्रेम देशमुख, तृतीय आर्यन बावणे, सिनियर गटात चॅम्पियन ऑफ चॅम्पियन, मुलींमध्ये प्रथम क्रमांक आरोही चव्हाण, द्वितीय क्रमांक लावन्या कोवे, तृतीय चेतना वाईलकर, सिनियर गटात चॅम्पियन ऑफ चॅम्पियन प्रथम क्रमांक प्रथम कोरेत, द्वितीय सार्थक गेडाम, तृतीय क्रमांक क्रिश घोगरे यांनी पटकाविला. बेस्ट काता सब जुनि. अर उत्कृष्ठ काता मुलींमध्ये प्रिषा काबरा, सावी पेरशिंगवार, मुलांमध्ये क्रीयांश भवरे, ओम भांड, उत्कृष्ट काता कराटेपटू प्रिषा काबरा व सार्थक नेरकर, उत्कृष्ट कराटेपटूचा बहुमान प्रेम देशमुख याने पटकाविला. उत्कृष्ट संघाचा बहुमान गोंडवाना सैनिकी विद्यालय गडचिरोलीने मिळविला.

स्पर्धेतील विजेत्यांना असो. सिएशनचे अध्यक्ष प्रशांत वाघरे, संदीप भांड, रुपराज वाकोडे, भूषण पेरशिंगवार, सुरेश कोवे, अविनाश वरगंटीवार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच व रेफरी मिलिंद गेडाम, महेंद्र वटी, प्रज्ञासूर्या रामटेके, शुभम कोडे, प्रथम वाकोडे, मोहित मेश्राम, सुनील कांबळे, क्रिष्णा चव्हाण, प्रथम कोरेत, अमित फुले, कपिल मसराम, सोनाली चव्हाण यांनी सहकार्य केले. संचालन योगेश चव्हाण यांनी केले.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, चंद्रपूर

### ई-निविदा सुचना क्रमांक ४५ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, सां. बा. परिसर, रामनगर, चंद्रपूर ( दुरध्वनी क्र. ०७१७२-२५६०२५) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील (क्र. ०१ ते ०६ ) कामाक. रीता ब - १ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवत आहेत. निविदा कागदपत्र संकेत स्थळावर www.mahapwd.gov.in येथुन डाउनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, चंद्रपूर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr. No. | Name of Work | Estt. No. | Tender Amount. | Tender Amount In Words |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing Annual Maintenance of E.I. of Non Residential Building of PWD (Elect.) Under Section 3, Gadchiroli, Ta. & Distt. Gadchiroli. | 347/GDL/ 2025-26 | 703480/- | Seven Lakh Three Thousand Four Hundred Eighty Only |
| 2 | Providing Renovation to E.I. to SDO Qtr at Wadsa, Tah. Wadsa & Distt. Gadchiroli. | 474/GDL/ 2025-26 | 340149/- | Three Lakh Forty Thousand One Hundred Forty Nine Only |
| 3 | Prov. E.I. to New Guard Room at Collector Bunglow, Complex Gadchiroli, Tah & Dist Gadchiroli.(Recall) | 391/GDL/ 2025-26 | 318793/- | Three Lakh Eighteen Thousand Seven Hundred Ninety Three Only |
| 4 | Prov. Urgent 10KVA Online UPS With Batteries in Conference Hall at Collector Office Complex Gadchiroli, Dist Gadchiroli.(Recall) | 318/GDL/ 2025-26 | 377676/- | Three Lakh Seventy Seven Thousand Six Hundred Seventy Six Only |
| 5 | Appointing MEP Design Consultant for Designing Estimation and Works Progress Monitoring for Various Proposed Works of District Administrative Building Gadchiroli, Dist Gadchiroli. (Recall) | 71/GDL/ 2025-26 | 199000/- | One Lakh Ninety Nine Thouysand Only |
| 6 | Appointing MEP Design Consultant for Designing Estimation and Works Progress Monitoring for Various Proposed Works of Construction of Auditorium Hall Gadchiroli, Dist Gadchiroli.( Recall) | 72/GDL/ 2025-26 | 422000/- | Four Lakh Twenty Two Thousand Only |

निविदा उपलब्ध कालावधी दिनांक :- १२/०९/२०२५ ते १९/०९/२०२५
निविदा सादर करण्याचा दिनांक :- २२/०९/२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत.
निविदा उघडण्याची दिनांक :- २२/०९/२०२५ दुपारी ०३.०० वाजे नंतर

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1. www.mahapwd.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल . )
२. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, चंद्रपूर कार्यालयातील सुचना फलक.

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. (विद्युत) विभाग, सिव्हील लाईन,
चंद्रपुर ४४२४०१
जा. क्र. २१२१ दि. ०८/०९/२०२५

(पूनम अजय वर्मा )
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, चंद्रपूर

